TIME : 2 Hrs. MARKS : 60

सूचना - १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

प्र. १ अ) पुढील माहितीच्या आधारे दूरचित्रवाणीसाठी (सोबत दाखवायच्या दृश्यांच्या सूचनेसह) जाहिरातीचा मसुदा तयार करा. (०८)

श्री बिजासनी बँक, ठाणे यांची सुशिक्षित बेकारांना कर्जवाटप सेवा

दृश्ये : १) पुस्तक विक्रेता तरुण २) रिक्षाचालक तरूण

३) सायकल दुकानदार तरूण ४) सलून व्यावसायिक तरूण,

निवेदन - पुरूषांचे (घोषवाक्य तयार करा.)

ब) खालील माहितीच्या आधारे वृत्तपत्रासाठी जाहिरात तयार करा. (०७)

उत्पादन : लहान बालकांचे अन्न (वयोगट ३ महिने ते दीड वर्ष)

ग्राहक - माता

उत्पादन : सीलबंद डब्यात पुरविले जाणार

डॉक्टरांचा अभिप्राय यात भरपूर लोह आहे.

उत्पादक : चाइल्डकेअर अँड कंपनी, नवी मुंबई

(मसुद्यात उत्पादनासाठी नाव व घोषवाक्य हवे)

किंवा

प्र.१. अ) पुढील माहितीच्या आधारे आकाशवाणीसाठी जाहिरातीचा मसुदा तयार करा. (८)

दिवाळी अंक

नाव : शंखध्वनी खास ''विनोद विशेषांक''

आवाजाचा वापर वेळ : २० सेकंद

ब) खालील माहितीच्या आधारे वृत्तपत्रासाठी जाहिरात तयार करा. (७)

उत्पादन : विहिरीतून पाणी उपसण्याचा पंप

ग्राहक :शेतकरी

उत्पादनाचे नाव : ''किसान मित्र''

उत्पादन : भारत शेती उद्योग महामंडळ, धुळे

प्र. २. अ) वृत्तपत्रातील वाचकांचा पत्रव्यवहार या सदरात येण्यासाठी तुम्ही राहत असलेल्या विभागातील लोडशेडींग (वीज पुरवठा वारंवार खंडित होणे) समस्येबाबत, संपादकांना पत्र लिहून कळवा. (८)

P.T.O.

ब) महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक क्रीडा महोत्सवातील महाविद्यालयाचे विद्यार्थी क्रीडा प्रतिनिधी म्हणून भाषण तयार करा. (७)

किंवा

प्र.२. अ) वृत्तपत्रासाठी वाचकांचा पत्रव्यवहार या सदरात येण्यासाठी तुम्ही राहत असलेल्या विभागातील कचऱ्याच्या व डासांच्या समस्येबद्दल संपादकांना पत्र लिहा. (८)

ब) महाविद्यालयात आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून भाषण तयार करा. (७)

प्र. ३. ''इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा समजावरील वाढता प्रभाव '' या विषयावर निबंधलेखन करा. (१५)

किंवा

प्र. ३. ''भारत क्रीडा महासत्ता बनेल का ? '' या विषयावर निबंधलेखन करा. (१५)

प्र. ४. अ) पुढील उताऱ्याचे हिंदी / इंग्रजीत भाषांतर करा. (८)

भाषांतर

दोन गोष्टीपैकी आपण प्रथम कोणती करावी यासंबंधी जो माणूस निश्चित निर्णय घेऊ शकत नाही. तो त्यापैकी कोणतीही गोष्ट करणार नाही. एखादा माणूस निर्णय घेतो, पण एखाद्या मित्राने त्याच्याविरुद्ध सूचना करताच निर्णयात फेरबदल होऊ देतो, एका मतापासून दुसऱ्या मतापर्यंत, एका योजनेपासून दुसऱ्या योजनेपर्यंत, जो हेंदकळत रहातो, आणि वातकुक्कुटाप्रमाणे वर्तुळाच्या प्रत्येक बिंदूकडे फिरत रहातो, आणि प्रत्येक लहरीच्या अधीन होतो, असा माणूस लहान वा मोठी कोणतीही कृती करू शकणार नाही. कोणत्याही गोष्टीत प्रगती करण्याऐवजी तो फार तर स्थिर राहील आणि बहुत करून सगळीकडून काढता पाय घेईल. जो माणूस शहाणपणाने विचार करतो, आणि नंतर पक्का निर्णय घेतो, आणि आपला इरादा अविचल अशा चिकाटीने, दुर्बल माणसाला भिवविणाऱ्या छोट्या अडचणींनी निराश न होता - अंमलात आणतो, तोच कुठल्याही क्षेत्रात उच्च पदाला जाऊ शकतो.

ब) पुढील उतारा संपादित करून पुर्नलेखन करा. (७)

आशयलेखण, कतालेखण संवाधलेखण प्रासंगीक पद्यरचना हे लेखनाविश्कार म्हणजे नीर्मीतीच्या दीषेने नेणाऱ्या वाटा. पुढे चरीत्र-आत्मकथण, पटकता - माहीतीपट यांचे लेखण, प्रेबादणपट संवाद या क्षेत्रांना त्या जाऊन मिळतात.

या सर्व भाशीक कौसल्यासाठी शबदसादना वावयरचणा, परिच्छेदलेखण यांची पूर्वतयारी हवी. प्रभावि अभिव्यक्तींसाठी या कौशल्यांचा सराव हवा.

किंवा

प्र. ४. अ) पुढील उताऱ्याचे हिंदी / इंग्रजीत भाषांतर करा. (८)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने दिला जाणारा पहिला ''आशा भोसले पुरस्कार'' रविवारच्या संध्याकाळी ठाणे येथे एका भव्य समारंभात दहा हजाराहूनही अधिक प्रेक्षकांच्या साक्षीने गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी स्वीकारला. पुरस्कार स्वीकारताना लतादिदी म्हणाल्या, 'आजचा हा क्षण माझ्या दृष्टीने खरोखरच सोन्याचा आहे. आशा ही अष्टपैलू गायिका आहे. यापूर्वी असे गाणे आपण कधीच ऐकले नाही; ' असे त्या मनमोकळेपणे म्हणाल्या.

प्र. ४ ब) पुढील उतारा संपादित करून पुर्नलेखन करा. (७)

भाषन-लेखणाची पूवतयारी श्रवनाप्रमानेच वाचणातूनहि होत असते. श्रवन-वाचनाची आवश्यकता केवळ लीहीन्यासाठी नव्हे तर एकूनच व्यवतीमत्त्ववीकासासाठी असते. वाचणामुळे मानसाची वीचारशमता वाडते, कल्पणाशक्ती वीकसीत होते. आपल्या संस्कृती परंपरांची ओळख होते. बुद्धीचा कलात्मक वीकास होतो. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने वाचनाचा मोठा लाभ म्हणजे त्याचा शब्दसंग्रह वाडतो. नव नव्या शब्दांची ओलख होते. कठीन शब्दांचे अर्थ कलतात.

❖❖❖